नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३६२ Issue - 362 | वार - सोमवार दि. २५ मे २०२६ Blow- Monday Date 25 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा भरपूर, शेतकऱ्यांनी विनाकारण घाई करू नये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्यात पेट्रोल डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने पेट्रोल पंपांवर रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. परभणीत तर भलीमोठी रांग लागली असताना चक्क पेट्रोल-डिझेलचे ड्रम घेऊन हाणामारी झाल्याचं पाहायला मिळालं. एकीकडे शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी डिझेल मिळेना झालंय, तर दुसरीकडे वाळू माफियांना तब्बल २५ हजार रुपयांचे डिझेल विक्री होत असल्याचाही प्रकार समोर आला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. त्यातच, शेतकऱ्यांनी ज्यावेळी लागेल त्यावेळेसच पेट्रोल डिझेल घ्यावे, साठा करू नये, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलंय.



**कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचे आवाहन**

दत्तात्रय भरणे पंढरीत विठ्ठल दर्शनासाठी आले असता, हवामान खात्याचा अंदाज चुकीचा ठरवून राज्यात धो धो पाऊस पडू दे असे साकडे त्यांनी पांडुरंगाला घातले. यावेळी, पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना, राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. शेतकऱ्यांनी कुठल्याही प्रकारची घाई गडबड करू नये. ज्यावेळेस पेट्रोल डिझेल लागेल त्यावेळेसच घ्यावे. उगाच साठवणूक करू नये, असे आवाहन दत्तात्रय भरणे यांनी पंढरीतून केले आहे.

जळगावात जिल्हाधिकारी पेट्रोल पंपावर

दरम्यान, एकीकडे राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा मुबलक असल्याचे दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे. मात्र, जळगाव शहरात डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याने चक्क जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी संयुक्तरित्या विविध पेट्रोल पंपांची पाहणी केली. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्तात डिझेलचे वितरण सुरू असल्याचेही यावेळी पाहायला मिळाले. यावेळी प्रशासनाने पेट्रोल व डिझेलचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत नागरिकांनी गोंधळून जाऊ नये, असे आवाहन केले. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने बाटल्या किंवा कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल देऊ नये, असे निर्देश पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी संबंधितांना दिले.

बुलढाणा जिल्ह्यात डिझेल टंचाईने हाहाकार उडवला असून अनेक पंपावर ट्रॅक्टर व वाहनाच्या अद्याप रांगा कायम आहेत. पंपचालक, ग्राहक तसेच पंप कर्मचारी यांच्यात वाद, हाणामारीच्या घटना वाढतच आहेत. या सगळ्यांना फाटा देत मेहकर ते चिखली मार्गावरील काठोळे या पंप चालकाने वाद, हाणामारी, गर्दी टाळण्यासाठी शक्कल लढविली असून डिझेल भरण्यासाठी आलेल्या ग्राहकाला चक्क कूपन वाटप करणे सुरू केल आहे. मागील चार पाच दिवसांपासून ही शक्कल लढवल्याने पंपावरील गर्दी कमी झाली, वाद, हाणामारी यासारख्या घटनांना सुद्धा आळा बसला आहे. कुपन दाखविल्यावरच ग्राहकांना डिझेल किंवा पेट्रोल मिळतं, याशिवाय दरदिवशी २०० कूपन वाटत असल्याने आलेल्या प्रत्येक ग्राहकांना डिझेल मिळत असल्याने त्यांचेही समाधान होत आहे.

## यवतमाळ जिल्ह्यात प्रचंड उष्णालहरी; उष्माघाताने ८ जण दगावल्याचा अंदाज

### गेल्या ४८ तासातील घटना, चौघांची ओळख पटली असून चौघे अज्ञात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० ते ४५ अंशावर गेला आहे. यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच यवतमाळ जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. यवतमाळ जिल्ह्यात प्रचंड उष्णलहरी सुरु असताना गेल्या ४८ तासात आठ जणांचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. हे सर्व मृत्यू उष्माघाताचे बळी असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार या सर्वांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन अहवाल यायचे असल्याने त्यानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. दिग्रस येथे चोवीस तासात तिघांच्या मृत्यूची माहिती पुढे आली होती. यासोबतच यवतमाळच्या चापमनवाडी आणि भोसा मार्गावर दोघांचे, पुसद मध्ये दोन तर बाभुळगाव येथे एकाचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. यातील चौघांची ओळख पटली असून चौघे अज्ञात आहेत. बाभुळगांवच्या गवंडी ते किन्ही रस्त्यावर पुलाखाली मारोतराव कावे यांचा मृतदेह आढळून आला. तर पुसदच्या हनुमान वॉर्डात अन्नपूर्णा मुळे या वृद्ध महिलेने भर उन्हात कुलर मध्ये पाणी भरले, त्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागलं, रूग्णालयात हलविल्यानंतर उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. पुसदच्याच नगरपरिषदेच्या इंदिरानगर भागातील डम्पिंग यार्ड समोर सुभाष राठोड यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. जिल्ह्यात प्रचंड उष्ण लहरी वाहत असून, भर उन्हात बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

हवामान विभागाने जिल्ह्याला आज रेड अलर्ट जाहीर केला आहे. त्यामुळे रविवारी सर्वाधिक तापमान व तीव्र उष्णतेची लहर राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. मागील तीन दिवसापूर्वी हवामान विभागाने ऑरेंज कलर दिला होता त्यामुळे या संपूर्ण आठवडा यवतमाळकरांना सोसावा लागणार आहे पुढील काही दिवस असे तापमान राहणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. नागरिकांनी उन्हात बाहेर पडू नये. शारीरिक श्रमाची कामे करू नये. मे महिन्यातील हा आठवडा सर्वाधिक उष्णतेचा ठरला आहे. तापमान सातत्याने कमाल ४५ अंशापुढे गेले आहे.


**संपूर्ण विदर्भात उष्णतेची लाट कायम**

संपूर्ण विदर्भात उष्णतेची लाट कायम असून शहराप्रमाणे ग्रामीण भागाला देखील या उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे ग्रामीण भागात देखील रस्ते निर्मनुष्य झाल्याचे चित्र बघायला मिळत आहे. गोंदिया जिल्ह्याचा तापमान ४५ अंशापर्यंत पोहोचला असून याचा फटका आता शहरासह ग्रामीण भागाला देखील बसतांना दिसत आहे. तर वाढत्या तापमानामुळे ग्रामीण भागात शेतीची काम दुपारी खोळंबलेली आहेत. दरम्यान, वाढत्या तापमानाचा मोठा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे.

## अक्कलकोट-कलबुर्गी महामार्गावरील ट्रक आणि कारचा भीषण अपघातात चार प्रवासी जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अक्कलकोट-कलबुर्गी महामार्गावर ट्रक आणि चारचाकी कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. अपघातात कार मधील ३ ते ४ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. मात्र ट्रकमधील तांदूळ रस्त्यावर पडल्यानं नुकसान झालं आहे. अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बुद्रुक येथील गावाजवळ हा अपघात झाला आहे. तांदळाच्या ट्रकने कारला धडक दिल्यानंतर ट्रक पलटी झाला आहे.



ट्रकमधील तांदळाचे पोते रस्त्यावर पडल्याचे पाहायला मिळाले. चारचाकी कारचे देखील मोठे नुकसान झाले आहे. अक्कलकोट-कलबुर्गी महामार्गावर अपघातामुळे काही वेळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

दरम्यान जखमी प्रवाशांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर रस्त्यावर पडलेले तांदळाचे पोते आणि ट्रक बाजूला करण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरु आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. एसटी बसची डिझेल टाकी निकामी होऊन खाली पडल्याची घटना घडली. धावत्या बसमध्ये डिझेल टाकी रस्त्यावरच पडली, मात्र, चालक आणि वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. करमाळा ते वाशिंबे मार्गावर धावणारी ही बस होती. करमाळा शहरात हा प्रकार घडला आहे.

**चालक व वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली**


पेट्रोल डिझेलच्या इंधन बचतीची सर्वत्र चर्चा सुरू असताना, करमाळ्यात मात्र एसटी बसची डिझेल टाकी अचानक रस्त्यावर तुटून पडल्याची घटना घडली आहे. एसटी बस रस्त्यावर धावत असताना बसची डिझेल टाकी निकामी होऊन पडली. करमाळा ते वाशिंबे मार्गावर धावणाऱ्या बस सोबत करमाळा शहरात हा प्रकार घडला. बसची डिझेल टाकी खाली पडल्याचे लक्षात आल्यावर तात्काळ बस चालकाने बस थांबवली. प्रवाशांना बसच्या खाली उतरवले. बसच्या चालक व वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना व जीवितहानी टळली आहे.

## पश्चिम बंगाल सरकार बांगलादेशी-रोहिंग्यांना परत पाठवणार; बेकायदेशीर स्थलांतरितांवर कठोर कारवाईचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पश्चिम बंगाल : पश्चिम बंगालमध्ये बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात राज्य सरकारने मोठे आणि निर्णायक पाऊल उचलले आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या नागरिकांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवण्यासाठी विशेष तात्पुरती निवास केंद्रे स्थापन करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

या संदर्भात राज्य सरकारकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून, त्यांच्या कार्यक्षेत्रात योग्य ठिकाणांची निवड करून ही केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषतः सीमावर्ती जिल्हे आणि संवेदनशील भागांवर प्रशासनाचे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, जिथे अवैध स्थलांतरित लपून बसण्याची शक्यता अधिक असल्याचे मानले जात आहे.



सरकारच्या या निर्णयामागे अवैध स्थलांतरितांवर अधिक काटेकोरपणे नजर ठेवणे आणि त्यांच्या ओळख पडताळणीची प्रक्रिया जलद करणे हा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पकडण्यात आलेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांना थेट कारागृहात न ठेवता या तात्पुरत्या केंद्रांमध्ये ठेवले जाणार आहे. ओळख निश्चित झाल्यानंतर त्यांना कायदेशीर प्रक्रियेनुसार त्यांच्या देशात परत पाठवले जाणार आहे.

दरम्यान, निवडणूक प्रचारादरम्यान भारतीय जनता पक्षाने राज्यातील अवैध स्थलांतर थांबवण्याचे आणि घुसखोरीवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. त्या पार्श्वभूमीवर आता सत्ता आल्यानंतर हे आश्वासन प्रत्यक्ष कृतीत उतरवले जात असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील सुरक्षा, सीमावर्ती व्यवस्थापन आणि स्थलांतर धोरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**एका महिन्यात चित्र पूर्ववत होण्याची शक्यता**

**आखाती देखातील वाढत्या तणावामुळे संपूर्ण जग वेठीस**

## इराण सामुद्रधुनीतील मार्ग खुला करण्यास तयार, पण कराराची व्याप्ती मर्यादित असेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष चर्चेतून संपण्याची शक्यता निर्माण झाली असतानाच आणखी एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. पुढील ३० दिवसात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांची संख्या पहिल्यासारखी होईल, असं इराणकडून जाहीर करण्यात आलंआहे. म्हणजेच अमेरिका आणि इराण युद्ध सुरु होण्यापूर्वी ज्या प्रमाणात जहाज होर्मुझमधून जात होती तितक्या संख्येनं जाऊ शकतात. ही जगभरातील विविध देशांसाठी दिलासा देणारी अपडेट आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जवळपास आंतरराष्ट्रीय इंधन पुरवठ्यापैकी २० टक्के वाहतूक होते. अमेरिका आणि इराण युद्धामुळं होर्मुझचा मार्ग बंद झाल्यानं आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार होर्मुझवरुन एक सहमती होत आहे. मात्र, इराणकडून देखील काही बाबी स्पष्ट करण्यात आल्यात, त्यानुसार होर्मुझमधील स्थिती युद्धाच्या पूर्वी होती तशी होईलच असं नाही. पाश्चिमात्य माध्यमांकडून होर्मुझमधील स्थिती पूर्ववत होईल, असं सांगण्यात आलं होतं. मात्र, याबाबतचं वृत्त इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेकडून फेटाळण्यात आलं आहे. तसनीम वृत्तसंस्थेच्या दाव्यानुसार या कराराची व्याप्ती मर्यादित असेल. रिपोर्टनुसार पुढील ३० दिवसांमध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीत ३० दिवसात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कमर्शिअल जहाजांची संख्या हळूहळू युद्धाच्या अगोदर असलेली स्थिती निर्माण करण्यासाठी योजना तयार केली जात आहे.इराणच्या आर्थिक घडामोडी सुरु होतील, ज्यामुळं थोडासा दिलासा मिळेल. आंतरराष्ट्रीय शिपिंगला वेग मिळेल. मात्र, सुरक्षा आणि रणनीती पहिल्यासारखी नसेल. गेल्या काही महिन्यात आखाती देशांमध्ये तणाव वाढला होता. अमेरिका आणि इस्त्रायलनं इराणवर हल्ले केल्यानंतर इराणनं देखील आखाती देशांमध्ये जिथं अमेरिकन लष्करी तळ असेल त्या देशांवर हल्ले केले होते. इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यानं जगाला होणाऱ्या तेलपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. जगभरात क्रूड ऑईलचे दर आणि बाजाराच्या स्थिती वर परिणाम झाला आहे.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून अमेरिका, इराण आणि त्या भागातील काही देशांसोबत लकवरकच एक करार होईल असं म्हटलं. या करारामध्येच होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरु करण्याचा समावेश असून त्याची लवकरच घोषणा केली जाईल, असंही ट्रम्प यांनी म्हटलं. दरम्यान, अमेरिका आणि इस्त्रायलनं इराणवर २८ फेब्रुवारीला हल्ले सुरु केल्यानंतर इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद करत अमेरिकेची कोंडी केली होती. होर्मुझमधून विनापरवाना जाणाऱ्या जहाजांवर इराणकडून हल्ले करण्यात आले होते.

## संपादकीय....

# अवैध साठा नको

राज्यात पेट्रोल डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने पेट्रोल पंपांवर रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. परभणीत तर भलीमोठी रांग लागली असताना चक्क पेट्रोल-डिझेलचे ड्रम घेऊन हाणामारी झाल्याचं पाहायला मिळालं. एकीकडे शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी डिझेल मिळेना झालंय, तर दुसरीकडे वाळू माफियांना तब्बल २५ हजार रुपयांचे डिझेल विक्री होत असल्याचाही प्रकार समोर आला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. त्यातच, शेतकऱ्यांनी ज्यावेळी लागेल त्यावेळेसच पेट्रोल डिझेल घ्यावे, साठा करू नये, असे आवाहन सरकारकडून नुकतेच करण्यात आले आहे. राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. शेतकऱ्यांनी कुठल्याही प्रकारची घाई गडबड करू नये. ज्यावेळेस पेट्रोल डिझेल लागेल त्यावेळेसच घ्यावे. उगाच साठवणूक करू नये, असे आवाहन कृषिमंत्र्यांनी नुकतेच केले होते. जळगाव शहरात डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्तात डिझेलचे वितरण सुरू असल्याचेही यावेळी पाहायला मिळाले.

# उत्पादन आणि लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात अनेक मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. मात्र, ज्या वेळी संधी उपलब्ध होतात, त्याच वेळी नवीन आव्हानेही समोर उभी राहतात. लॉजिस्टीक्सवर होणारा खर्च हेच सध्या उत्पादन क्षेत्रापुढील सर्वात मोठे आव्हान असून जागतिक पुरवठा साखळीचा प्रभावी भाग बनायचे असेल, तर आपल्याला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने गोंडखैरी येथे उभारण्यात आलेल्या गोदाम लॉजिस्टिक्स पार्कच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासह आमदार डॉ. आशिष देशमुख, परिणय फुके, गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक महावीर जैन, के. के. गुप्ता, राजन अग्रवाल, जयप्रकाश गुप्ता, कृष्णकुमार गुप्ता, हल्दीरामचे शिवकिसन अग्रवाल आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूर व गडचिरोली भागातही आता उद्योग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. त्यामुळे लॉजिस्टीक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार आहेत. सध्याची स्थिती पाहता आणखी कितीतरी



प्रमाणात लॉजिस्टीक्सच्या व्यवस्थेत वाढ होण्यास वाव दिसत आहे. या क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून गोदाम लॉजिस्टिक्स पार्क हा नागपूरच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ईलेक्ट्रिक वाहनामुळे लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी होईल – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

मालवाहतुकीत ईलेक्ट्रिक वाहनांचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्यास इंधन खर्चाच्या बचतीसह पर्यावरणालाही मदत होईल आणि पर्यायाने लॉजिस्टिक्सवर होणारा खर्चही कमी करता येईल, असा विश्वास केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

संचालक महावीर जैन यांनी आपल्या प्रास्ताविकेत गोदाम लॉजिस्टिक्स पार्कबाबत माहिती दिली. राजन अग्रवाल यांनी आभार मानले. दरम्यान, मध्य भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक औद्योगिक लॉजिस्टिक्स पार्कपैकी एक असा हा पार्क तब्बल २५ लाख चौरस फुटाच्या दर्जेदार ‘वर्ग अ’ गोदाम क्षमतेसह सुमारे १०५ एकर जागेत उभारण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे संचालित स्मार्ट वेअर हाऊसिंगची अत्याधुनिक सुविधा या प्रकल्पात समाविष्ट आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपात सुमारे १५ हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ आणि समृद्धी महामार्गाशी धोरणात्मकदृष्ट्या जोडण्यात आलेला असा हा महत्त्वाचा लॉजिस्टिक प्रकल्प आहे. या प्रकल्पात सुमारे सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून प्रकल्पात सौर उर्जा संयंत्राचा समावेश करण्यात आला आहे.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी ‘आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन’ साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे.

ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.

मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.

भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.

शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.

महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.

आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.

पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

आज जगभरात ‘झिरो वेस्ट’ आणि ‘सस्टेनेबल लिव्हिंग’ या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.

समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे ‘वापरा आणि फेका’ ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.

प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. लग्नसमारंभ, जत्रा, उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डिस्पोजेबल प्लेट्स, कप आणि पाण्याच्या बाटल्यांचा वापर होतो. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पत्रावळी, स्टीलची भांडी आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

पर्यटन क्षेत्रातही प्लास्टिक प्रदूषण मोठी समस्या बनली आहे. डोंगराळ भाग, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. पर्यटनस्थळांवर प्लास्टिक नेण्यावर निर्बंध आणणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि पर्यटकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. निसर्गरम्य स्थळांचे सौंदर्य टिकवण्यासाठी प्लास्टिकमुक्त पर्यटन ही काळाची गरज आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होतो. प्लास्टिक कचऱ्यामुळे पाण्याचे स्रोत दूषित होतात. ग्रामीण भागात जैविक शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन प्लास्टिक वापर कमी करता येऊ शकतो. शेतकरी संघटना आणि कृषी विभागांनी या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

आज अनेक संशोधक प्लास्टिकला पर्याय शोधण्याचे काम करत आहेत. मका, ऊस, बटाटा स्टार्च आणि समुद्री वनस्पतींपासून जैवविघटनशील पदार्थ तयार केले जात आहेत. हे पदार्थ पर्यावरणात सहज विघटित होतात. तथापि, अशा पर्यायांचा खर्च अजूनही तुलनेने अधिक आहे. सरकारने संशोधनाला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक उद्योगांना मदत केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या आणि टिकाऊ वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. त्यामुळे वारंवार नवीन वस्तू खरेदी करण्याची गरज राहत नाही. स्थानिक कारागीर आणि लघुउद्योगांनाही यामुळे रोजगार मिळू शकतो.

निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परावलंबी आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी मानवाचेच नुकसान होय. पृथ्वीवरील संसाधने मर्यादित आहेत. आपण आज केलेल्या चुका भविष्यातील पिढ्यांना भोगाव्या लागू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे.

प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे.

आजच्या काळात मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. घरात आणि शाळेत पर्यावरणपूरक सवयी लावल्या पाहिजेत. मुलांनी स्वतः प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला तर भविष्यात समाजात मोठा बदल घडू शकतो.

प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरण विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवता येते. यशस्वी उपक्रमांची उदाहरणे समाजासमोर मांडल्यास इतरांनाही प्रेरणा मिळते.

अनेक गावांनी आणि शहरांनी प्लास्टिकमुक्त होण्याचा आदर्श निर्माण केला आहे. काही गावांमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कापडी पिशव्यांचा वापर सुरू केला आहे. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा प्रसार होणे गरजेचे आहे.

आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे. आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. ‘रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल’ या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.

आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो.

या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वन्य प्राण्याच्या हल्ल्याने सारणी गावात भीतीचे वातावरण

## सारणीतील व शेत शिवारातील शेतकऱ्याकडून व ग्रामस्थांकडून कारवाईची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी/अमर जाधव
पंधरा दिवसात अनेक पाळीव जनावरावर हल्ले प्रशासनाकडून तातडीने कारवाईची मागणी सारणीतील व शेत शिवारातील शेतकऱ्याकडून व ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून वन्य प्राण्याकडून पाळीव प्राणी व जनावरांवर हल्ल्याच्या घटना वाढल्याने शेतकरी व पशुपालकामध्ये भीतीची वातावरण निर्माण झाले आहे

### शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये

**वन्य प्राण्याच्या हल्ल्याबाबत शेतकऱ्यांनी घाबरून न जाता वन विभागाकडे तक्रार करावी प्राप्त करारीवर योग्य त्या उपाययोजना करण्यात येईल असे वन विभागाचे पांडुरंग चिल्ले या अधिकाऱ्यांनी सांगितले**

शेतामध्ये व बांधलेल्या शेळ्या म्हशी गाई वासरे आधी जनावरांवर हल्ले होत असल्यामुळे मोठे नुकसान होत आहे.

त्यामुळे पशुधनाच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे सारणी माकणी सास्तुर मातोळा गुबाळ नांदुर्गा देवताळा आदी गावातील पशुपालकांमध्ये मोठे चिंता व्यक्त केली जात आहे.

आज जनावरावर हल्ले होत असले तरी उद्या माणसावरही हल्ले होण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत त्यामुळे अनेक शेतकरी शेतात जाण्यास घाबरत असून स्वतःच्या जीविताच्या भीतीमुळे काहींनी शेताकडे जाणे कमी केले आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे शेतातील झाडाखाली पशुधन बांधून ठेवले आहे.

### आर्थिक मदतीची केली मागणी

**आर्थिक पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जाणाऱ्या पशुपालकावर आता वन्य प्राण्याचे संकट ओढलेली आहे या प्रकरणामुळे या प्रकरणामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व पशुपालकांनी तहसीलदार जिल्हाधिकारी आमदार खासदार तसेच संबंधित प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करून मनुष्यहानी टाळावी तसेच नुकसानग्रस्त शेतकरी व पशुपालकांना नैसर्गिक आपत्ती प्रमाणे आर्थिक मदत द्यावी.**

**सध्या कडक उन्हाळा असल्यामुळे शेतामध्ये झाडाखाली म्हशी वासरे बांधलेले होते जनावरे बघून यामध्ये म्हशीचे कान व पायावर चावा घेऊन जखमी केले आहे**
**– नाना पाटील (शेतकरी)**

**झाडाखाली बांधलेले म्हशीला व वासराला चावा घेऊन जखमी केलेले आहे**
**–बालाजी तामसट्टे (शेतकरी)**

**विभागाकडे लवकरात लवकर तक्रार करून उपाययोजना करण्यात येईल व सध्या गावांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहेत त्यामुळे वन्य विभागाने लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात**
**– तुकाराम वागमारे (सरपंच)**



# दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेच्या पाल्यांना सोनई फाउंडेशन कडून शालेय साहित्य वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : सोनाई फौंडेशनची संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड यांची सुपुत्र आयुष्याच्या वाढदिवसानिमित्त दक्षिण सोलापूर पत्रकार संघाच्या पत्रकार पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर पंचायत समिती माजी सभापती होते यावेळी व्यासपीठावर सोनाई फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड, मंद्रुप चे पोलीस उपनिरीक्षक राज डांगे, सरपंच अनिता कोरे, उद्योजक मिथुन मुंगळे, आयुष राठोड दक्षिण सोलापूर तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पंचाक्षरी स्वामी, काशिनाथ बदगुंकी, प्रदीप सुरवसे, ज्येष्ठ पत्रकार अमोल सिद्ध लांडगे रजा बागवान आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित ५४ पत्रकार पाल्यांना शैक्षणिक साहित्याची वितरण करण्यात आले प्रारंभी शिवराज राठोड यांचा आठवा वाढदिवस केक कापून मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला यावेळी माजी सभापती गुरुसिद्ध मैत्री म्हणाली की युवराज आठवडे यांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार बांधवांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा निर्णय घेतला हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे विद्यार्थ्यांना कष्ट आणि जिद्दीने अभ्यास करून जीवनात उज्वल यश मिळवावे असे आव्हान त्यांनी केले.यावेळी पोलीस उपनिरीक्षक राज डांगे म्हणाली की पत्रकार हा दिवस रात्र काम करून समाजाचे प्रश्न मांडत असताना मात्र स्वतःच्या प्रश्नाकडे तू नेहमी दुर्लक्ष करतो युवराज राठोड यांनी पत्रकार पाल्यांची उज्वल भविष्यासाठी शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे त्यांचा हा उपक्रम प्रेरणादायी आहे व दक्षिण सोलापूर तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पंचाक्षरी स्वामी हे नेहमीच जनतेचे प्रश्न तसेच पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात व प्रास्ताविक मध्ये संघटनेचे अध्यक्ष स्वामी यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत युवराज राठोड यांच्या कार्याची कौतुक केले व या पुढील काळातही राठोड यांचे सहकार्य असे लाभेल अशी अपेक्षा व्यक्त केली यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभू पुजारी यांनी केले तर आभार पत्रकार नित्यानंद वारे यांनी मानले.

यावेळी या कार्यक्रमास पत्रकार अशोक सोनकठले, बबलू शेख, समीर शेख, दिनकर नारायणकर, बालाजी वाघे, प्रमोद जवळ कोठे गुरु दादा गायकवाड अप्पू देशमुख निर्मल गुरव मनसिद्ध देशमुख उड्डाण शिव हरीप नदाफ गजानन काळे आनंद बिराजदार शिवराज मुंगळे शिवाप्पा स्वामी महासिद्ध सावळे महावीर रणखांबे आधी उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुका जि. प. सेवकांची सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी नागनाथ होटकर तर उपाध्यक्षपदी शिवपुत्र ढोपरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट : अक्कलकोट तालुका जिल्हा परिषद सेवकांची सहकारी पतसंस्था (नियमित), अक्कलकोट या संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी नवनिर्वाचित संचालक मंडळाची विशेष सभा रविवार, दिनांक १७ मे २०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. या सभेच्या पीठासीन अधिकारी म्हणून मा. सौ. सी. आर. नाटकर यांनी काम पाहिले.

या महत्त्वपूर्ण सभेमध्ये अध्यक्षपदासाठी श्री. नागनाथ बळीराम होटकर आणि उपाध्यक्षपदासाठी श्री. शिवपुत्र ढोपरे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाले होते. दोन्ही पदांसाठी इतर कोणतेही अर्ज न आल्यामुळे



अध्यासी अधिकारी सौ. सी. आर. नाटकर यांनी श्री. नागनाथ होटकर यांची अध्यक्षपदी, तर श्री. शिवपुत्र ढोपरे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली. या बिनविरोध निवडीमुळे संस्थेच्या वर्तुळात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्याकडून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन

या बिनविरोध निवडीबद्दल अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, अक्कलकोटचे नगराध्यक्ष श्री. मिलनदादा कल्याणशेट्टी आणि उपसभापती श्री. सागरदादा कल्याणशेट्टी यांनी नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालकांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**मान्यवरांची उपस्थिती**

याप्रसंगी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष श्री. अभय नेलुरे साहेब, आरोग्य विभागाचे श्री. परमेश्वर बिराजदार, विस्तार अधिकारी श्री. चंद्रकांत थोरात साहेब, श्री. मठ साहेब, श्री. गणराज वाघमोडे, श्री. रेवनसिद्ध बोरगाव, सौ. निलावती चव्हाण मॅडम, श्री. कल्याणी चौघुले, श्री. नागनाथ सोरेगाव, श्री. मल्लिनाथ घंटे, श्री. रतन कलाल यांच्यासह अनेक मान्यवर, सभासद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेचे व निवडीचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज श्री. पेढसंगे यांनी अत्यंत चोखपणे पाहिले. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांच्या समर्थकांनी व जि. प. सेवकांनी एकच जल्लोष केला.

# तुगाव येथील दलित बौद्ध तरुणास मारहाण प्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागारी (एस.के.गायकवाड):
उमरगा तालुक्यातील तुगाव येथील आंबेडकरी चळवळीतील एका तरुण युवा कार्यकर्त्यास तुगाव येथिल जातीयवादी गावगुंडानी संगणमत करून कट रचून जातीय द्वेशभावनेतून शेताकडे जबरदस्तीने घेवून गेले व त्यास लाथा बुक्कीने कंबर पट्ट्याने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केलेआहे.सरदर घाटना ही मानवतेला काळीमा फासणारी असून या मारहाण प्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करा अशी मागणी करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) लोहारा तालुका शाखेच्या वतीने जाहीर

### रिपाइं (आठवले) ची मागणी

निषेध करत उमरगा येथील उप विभागीय पोलीस अधिकारी याना लेखी निवेदन देण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उमरगा येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) लोहारा तालुका शाखेच्या वतीने या संदर्भात एक लेखी निवेदन देण्यात आले असून त्यात म्हटले आहे की उमरगा तालुक्यातील तुगाव येथील आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते भालचंद्र कांबळे याला तुगाव येथील जातीवादी गावगुंड चांद फकीर,रोहित जोमदे,पंकज जोमदे, गहिनीनाथ जमदे संगणमताने कट करून त्याला जेवणाचे आमंत्रण देऊन दिशाभूल करून आष्टामोड येथील त्यांच्या शेताकडे नेऊन द्राक्षाच्या बागेतील खांबाला बांधून लाथा बुक्क्याने काठीने व कमर पट्ट्याने जबरदस्त मारहाण करून गंभीर केल्याची मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली आहे. या घटनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले (लोहारा) तालुका शाखेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून या प्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करा अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने या संदर्भात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. .

.उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा यांना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं चे राज्य कार्यकारणी सदस्य एस.के..चेले, माजी समाज कल्याण सभापती हरिष डावरे, लोहारा तालुका अध्यक्ष काका भंडारे, रिपाइं चे अर्जुन मुके, संजय कांबळे, धिरज बेळंबकर, दगडू भोसले, प्रदिप भालेराव, खंडू भंडारे, रत्नदीप सोनकांबळे, उमरगा तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

**अस्वस्थ करणारे अतिक्रमण, पार्किंग व्यवस्था कधी दुर्लक्ष यामुळे च ऑर्डरचा घाट..**

# अधिक मासानिमित्त बाहेरून येणाऱ्या वाहनांना वाहन तळ उपलब्ध करून द्यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : शासनाने कॉरिडॉर उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे खरे, पण स्थानिक परप्रांतीय रस्त्यावर बसून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनी केलेल्या अतिक्रमण आणि बाहेरून येणाऱ्या वाहनांना पुरेसे वाहनतळ उपलब्ध नसलेले शहराची अवस्था बकाल झाली आहे. स्थानिक नगरपालिका, पोलीस प्रशासनाने आणि राजकीय नेत्यांनी केलेली दुर्लक्ष ते मुळे शहरात सातत्याने वाहतुकीची कोंडी होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे, यातच पूर्वीच्या विस्थापितांना नुकसान भरपाई अद्याप मिळाले नसल्याने कॉरिडॉर प्रकल्पाला पंढरपुरातून मोठा विरोध होत आहे. पंढरपूर हे दक्षिणकाशी भारतातील सर्वात मोठे आणि प्राचीन तीर्थक्षेत्र



आहे. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक वर्षभर ये जा करतात त्यामुळे प्रासादिक वस्तू, धातूंचे कळस तसेच मुर्त्या, विना आणि पखवाज, व तुळशीच्या माळा प्रसाद यांच्या व्यापाऱ्यातून अब्जावधी रुपयांचा उलाढाल


दरवर्षी होत असते येणाऱ्या भाविकांना मिळणारी जेवण आणि चहापाणी यासाठी राव वर्षाला तीन ते पाच कोटी रुपयांची उलाढाल होते एकूण पंढरपूरचे अर्थचक्र पंढरपूरला येणाऱ्या या भाविकांवर अवलंबून आहे स्थानिक राजकीय नेत्यांच्या आणि प्रशासनाच्या पाठिंबावर पंढरपूरमध्ये अतिक्रमण करण्याची जणू स्पर्धा लागली आहे फळ विक्रेते, मुर्त्या तयार करणारे, कपडे विक्रेते, प्रसादिक वस्तू विकणारी अशा व्यापाऱ्यांनी मंदिर परिसरात जणू घेऊन टाकला आहे. आषाढी एकादशी यात्रेच्या सोहळ्यापूर्वी आठ दिवस आधी पूर्वतयारी म्हणून मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय अध्यक्ष हटवली जाते यावर कायमस्वरूपी ठोस उपाय योजना केली जात नाही त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यावर बांधण्यात आलेल्या नवीन इमारतींना परवानगी देताना नवीन बांधकामांमध्ये पार्किंगची सोय केली आहे का नाही याची खात्री न करता नगरपालिका प्रशासनाने वापर परवाना दिल्याने स्थानिक मान चालक आपली वाहने रस्त्यावरच लावत आहे बाहेरून येणाऱ्या वाहनांचा पुरेसा वाहनतळ उपलब्ध न करून दिल्यामुळे वाहतुकीची कोंडीत दिवसेंदिवस वाढत आहे सुट्टीच्या दिवशी वाहतुकीची कोंडी होणार ठिकाणी अभ्यास होऊन पोलीस स्पर्शाने आणि त्या ठिकाणी सिग्नल व्यवस्था किंवा एकीर वाहतूक सुरू करणे ही अपेक्षित आहे शहरांमध्ये नो पार्किंग झोन निर्माण करून या ठिकाणी पार्किंगसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे शहरातील ठिकठिकाणी असणारे अतिक्रमण कायमस्वरूपी काढून टाकून मंदिराकडे जाणारे सर्व रस्ते प्रशस्त केले पाहिजे यासाठी प्रशासनाला आणि राजकीय नेत्यांना जाग यायला हवी.तरच ते पंढरपूर शहर वाहतुकीची कोंडी पासून आणि धूळ पासून मुक्त होऊन मोकळा श्वास नागरिकांना घेता येईल केवळ कॉरिडॉरला विरोध करण्याऐवजी पंढरपूर शहर बकाल होण्यापासून वाचवण्यासाठी स्थानिक जनतेने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

# केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या कृषी निर्यात, व्यापार, वाहतूक संबंधित पाठपुराची घेतली दखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : इराण, इस्त्राईल-अमेरिका या युद्धाच्या पार्श्वभूमीवर होमवर्ज येथील वाहतूक संघटनेमुळे निर्यातदार, शेतकरी व व्यापार क्षेत्रावर होणाऱ्या परिणामदार पार्श्वभूमीवर खासदार मा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्र सरकारकडे तातडीने उपाय योजनेची मागणी केली होती त्यास प्रतिसाद देत केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री मा. पियुष गोयल साहेब यांनी पत्राद्वारे माहिती दिली असून केंद्र सरकारने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून विविध मंत्रालयाच्या समन्वयातून तातडीच्या उपयोजना सुरू केल्याचे नमूद केले आहे.

यामध्ये

१) निर्यात ट्रान्स्फिश पेमेंट सुलभता २) प्रभावित खेपांसाठी शुल्क सवलती ३) पर्यायी म



ार्गाची उपलब्धता ४)ठजउद्धएझ दरवाढ ५)एउत्रछ मार्फत मदत ६) खराब होणाऱ्या कृषीमालांसाठी विशेष उपाययोजना, ७) ग्रीन कॉरिडोर व समर्पित सिंपिंग व्यवस्था यासारख्या महत्त्वाच्या नेण्याचा समावेश आहे.

शेतकरी निर्यातदार आणि व्यापारी क्षेत्राच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे खासदार मा श्री धैर्यशील मोहिते पाटील यांचे प्रयत्न निश्चितच दिला जात आई ठरत आहेत.

# पंढरपुर शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अधिकमास निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक पंढरपूरात येतात. शहरातील वाहतुक कोंडीमुळे नागरिकांना तसेच येणाऱ्या भाविकांना रहदारीच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी अवजड वाहने बाह्यवळणाने जातील याची दक्षता घेवून, शहरातील रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सुचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

अधिकमास निमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय. मुजावर, मंदीर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम,



लेखाधिकारी मुकेश अनेचा, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेवून, भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी जादा पोलीस बंदोबस्त नेमावा. शहरातील नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत. मंदीर परिसर, प्रदक्षिणा मार्ग येथील अतिक्रमण मोहिम सुरु ठेवावी. वाळवंटात फिरते विक्रेते, वाहने प्रवेश करणार नाहीत याची दक्षता घेवून आवश्यक उपाय योजना कराव्यात. शहरातील अनाधिकृत होर्डींग तात्काळ काढावेत तसेच आचारसंहिता लागू झाल्याने राजकीय होर्डींग तात्काळ काढावेत अशा सूचना प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

यावेळी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेवून भाविकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. तसेच भाविकांना फिरते विक्रेत्यांचा व अतिक्रमणाचा त्रास होऊ नये यासाठी शहरात नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने मोहिम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

अधिकमास कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदीर समिती मार्फत आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, भाविकांना दर्शन रांग, दर्शन मंडप येथे मॅट,पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष, शौचालय, स्वच्छता, वैद्यकीय उपचार आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन प्राधान्य दिले असून, दर्शनरांगेत घुसखोरी होऊ यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. भाविकांसाठी दर्शनरांगेत स्प्रिंकलर बसविण्यात आले आहेत. तसेच भाविकांच्या सुविधेसाठी स्वंयसेवक, कंत्राटी कर्मचारी, मंदीर समिती कर्मचारी अशा एकूण १२०० कर्मचारी व स्वयंसेवाची नेमणूक केली असल्याचे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

यावेळी अधिकमास कालावधीत पंढरपूर नगर पालिका प्रशासनाकडून आरोग्य, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, अतिक्रमण मोहिम आदी बाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी यावेळी दिली.

## महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची एन्ट्री! पुणे सांगली सातारा सह या जिल्ह्यामध्ये पावसाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : एकीकडे उन्हाळी चटके लागत असताना दुसरीकडे राज्यातील जनतेला लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे. पुणे आणि साताऱ्यासह कोकण आणि मराठवाड्यात पावसाची दाट शक्यता हवामान खात्याने वर्तव्य आहे.

त्यामुळे ऐन उन्हाळ्यात राज्याला पावसाचा दिलासा मिळण्याची चिन्ह आहेत मुंबई शहर आणि उपनगरामध्येही हवामानात बदल पाहायला मिळणार आहे मुंबईत कमाल तपमान चौथी संख्या वर स्थिर राहणार असली तरी आकाश दहार राहील तसेच मुंबई व आसपासच्या भागात हलक्या सरी पोचतील असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

ठाणे जिल्ह्यात आज सकाळपासून मान्सूनपूर्व पावसाने दमदार हागरी लावली आहे. जिल्ह्यातील शहापूर भिवंडी कशेळी मुरबाड काळवा बालेगाव घोडबंदर रोड आणि मुंब्रा या भागात पहाटेपासूनच पावसाच्या सरी कोसळत आहेत येत्या काही दिवसापासून ठाणेकर कडाक्याच्या उन्हामुळे आणि प्रचंड उघड्यामुळे त्रस्त झाली होती आता या मान्सूनपूर्व पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून नागरिकांना मोकळ्या पासून मटार दिलासा मिळाला आहे.

## रस्त्यावरील व दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक', मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रस्त्यावर राहणाऱ्या, अनाथ, एकल आणि दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' पथदर्शी योजना सहा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली होती. या पथदर्शी योजनेच्या धर्तीवर २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिकांमध्ये फिरते पथक योजनेसाठी प्रस्ताव मागविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात 'फिरते पथक' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत मोबाईल वाहनांच्या माध्यमातून रस्त्यावरील बालकांना पौष्टिक आहार, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच बालकांची आधार नोंदणी, समुपदेशन, मानसिक आधार आणि पालकांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. रस्त्यावरील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

यापूर्वी नाशिक, पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाद्वारे आतापर्यंत ३ हजार ८०३ बालकांना शैक्षणिक, आरोग्यविषयक, मनोरंजन तसेच आहार सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ६७९, मुंबई शहरात ८१०, ठाण्यात ७५०, नाशिकमध्ये २८५ आणि नागपुरात २७९ बालकांचा समावेश आहे.

राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांसह मुंबई शहर, पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर अशा एकूण ३१ फिरत्या पथकांची अंमलबजावणी प्रस्तावित करण्यात आली आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, स्वयंसेवी संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी, निधी पोर्टलवरील नोंद, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तसेच संस्थेची घटना आणि नियमावली सादर करणे आवश्यक राहील. तसेच फिरत्या पथकांसाठी नियुक्त वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ट्रॅकिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक करण्यात येणार असून ही यंत्रणा संबंधित पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्य करेल.

## दिल्ली हायकोर्टाची विनेश फोगाटला आशियाई क्रीडा स्पर्धेच्या चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाटच्या बाबतीत सुरू असलेल्या वादात मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने तिला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे. यापूर्वी शुक्रवारी, न्यायालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती आणि म्हटले होते की, क्रीडा संघटनांनी सूडबुद्धीने नव्हे, तर खेळाडू आणि खेळाच्या सर्वोत्तम हितासाठी काम केले पाहिजे.

सरन्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला विनेश फोगटच्या तंदुरुस्तीचे मूल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. याच्या आधारावर, तिला ३०-३१ मे रोजी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल.

सुनावणीदरम्यान, न्यायालयाने तोंडी टिप्पणी केली की देशात मातृत्वाचा आदर केला जातो आणि त्याचा वापर खेळाडूच्या कारकिर्दीच्या विरोधात केला जाऊ नये. न्यायालयाने म्हटले, ''मातृत्व हा एक उत्सव आहे. कोणत्याही खेळाडूसाठी ते हानिकारक ठरू नये.'' वास्तविक पाहता, विनेश फोगाट जुलै २०२५ मध्ये आई झाली आणि आता देशांतर्गत स्पर्धांमध्ये पुनरागमन करण्याची तयारी करत आहे.

भारतीय कुस्ती महासंघाने नुकतेच विनेश फोगाटला २६ जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अपात्र घोषित केले आहे. महासंघाने असा युक्तिवाद केला की, युनायटेड वर्ल्ड रेसलिंगच्या उत्तेजक-विरोधी नियमांनुसार, निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या कोणत्याही खेळाडूने किमान सहा महिन्यांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. डब्ल्यूएफआयच्या मते, विनेशने ही अनिवार्य पूर्वसूचना पूर्ण केली नाही, ज्यामुळे ती देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अपात्र ठरली आहे.

विनेशला बजावलेल्या १५-पानांच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये, डब्ल्यूएफआयने तिच्यावर बेशिस्त आणि उत्तेजक-विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. या नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की तिच्या वर्तनाने भारतीय कुस्तीच्या प्रतिमेला धक्का पोहोचला आहे. सुनावणीदरम्यान, विनेशचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वरिष्ठ वकिलाने न्यायालयाला सांगितले की, ९ मे रोजीची नोटीस, ज्यात तिच्या पॅरिस ऑलिम्पिकमधील अपात्रतेला 'राष्ट्रीय लाजिरवाणी गोष्ट' म्हटले होते, ती पूर्वग्रहदूषित आणि अपमानजनक होती. खंडपीठाने तीव्र शब्दांत टिप्पणी केली, ''एखादा राग किंवा वाद असेल तर खेळाचा बळी का द्यायचा? विनेश एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. आई झाल्यानंतर अवघ्या १० महिन्यांत तिला चाचण्यांमधून वगळण्याचे काय समर्थन आहे?''

यापूर्वी, १८ मे रोजी, उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने विनेशला तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला होता. तिने या निर्णयाविरोधात द्विसदस्यीय खंडपीठात अपील केले होते, ज्याने आता हा निर्णय दिला आहे.

## १० दिवसात तिसऱ्यांदा इंधन दरवाढ; आरबीआयकडून महागाई वाढण्याचा इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वाढत्या महागाईमुळं आधीच त्रस्त असलेल्या जनतेला शनिवारी दहा दिवसात तिसऱ्यांदा इंधन दरवाढीचा सामना करावा लागला. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये पुन्हा वाढ करण्यात आली असून, नवीन दरानुसार पेट्रोल प्रतिलिटर ८७ पैशांनी, तर डिझेल ९१ पैशांनी महागले आहे. या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोलचा दर १०७.८७ रुपये प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९४.३९ रुपये प्रति लिटर झाला आहे. इराण युद्धामुळं वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेचा परिणाम आता थेट इंधन दरांवर दिसू लागला आहे. त्यामुळं एकूणच महागाई वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

इंधन दरवाढीचा चढता आलेख; मुंबईकर त्रस्त : १५ मे रोजी इंधनाच्या दरात युद्धकाळानंतर प्रथमच प्रतिलिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे रोजी पुन्हा ९० पैशांची वाढ झाली. यावर प्रतिक्रिया देताना काही मुंबईकरांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. ''सरकार ईव्हीचा पर्याय देत आहे, पण ईव्ही खरेदी करण्याइतकी आर्थिक क्षमता सर्वसामान्यांकडं आहे का?, याचाही विचार व्हायला हवा,'' अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. ''सरकार टप्प्याटप्प्याने इंधन दरवाढ करत आहे, मात्र त्या प्रमाणात लोकांचे उत्पन्न वाढत नाही. भविष्यात वाढता खर्च पेलणे कठीण होईल,'' अशीही भावना नागरिकांनी व्यक्त केली.

राज्यातील परिस्थिती काय : शनिवारी पुन्हा झालेल्या ताज्या वाढीनंतर पेट्रोल-डिझेलच्या किमतींमध्ये आता १० दिवसांत जवळपास ५ रुपयांची दरवाढ झाली आहे. राज्यातील काही प्रमुख महानगरांमध्ये इंधनाचे दर पुढील प्रमाणे आहेत.

आखाती युद्धाचा परिणाम वाढू लागला : जागतिक स्तरावर आखाती युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळं भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांवर आर्थिक दबाव वाढत आहे. इंधनाच्या वाढलेल्या आयात खर्चामुळे सरकारवरही ताण भरून काढण्यासाठी इंधन दरवाढीला सध्यातरी पर्याय नाही. पेट्रोल-डिझेलच्या सततच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढणार असून, त्याचा परिणाम भाजीपाला, अन्नधान्य, दैनंदिन वस्तू आणि इतर आवश्यक सेवांच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे.

आरबीआयची चिंता; महागाई वाढण्याचा इशारा : युद्धामुळं जगावर आता ऊर्जा संकट कोसळलंय. भारतीय अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम दिसू लागलाय. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मध्य-पूर्वेतील तणावाबाबत चिंता व्यक्त केली आहे. युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास भारतात महागाईची दुसरी लाट येऊ शकते, असा इशारा आरबीआय ने दिला आहे. आरबीआयच्या मते, युद्धामुळे ऊर्जा क्षेत्रात मोठी उलथापालथ होऊ शकते. इंधन दर आणखी वाढू शकतात, व्यापारी तूट वाढू शकते आणि रुपयावर दबाव येईल, असं आरबीआयनं एका निवेदनात स्पष्ट केलंय. युद्धामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या वधारलेल्या किमती घटण्याची सध्यातरी कोणतीही चिन्ह नाहीत. इंधन दरवाढ कायम राहिल्यास दळणवळण आणि मालवाहतूक महागेल. परिणामी सर्वच वस्तूंच्या किमती वाढून महागाईचा भडका उडू शकतो, असा इशाराही आरबीआय ने दिला आहे.

भारतातील परदेशी गुंतवणूक मंदावेल, जाणकारांचा दावा : यावर आर्थिक जाणकार विश्वास उट्टगी यांच्यामते, ''महागाईचा असाच स्फोट झाल्यास परदेशी गुंतवणूकदार भारतातून आपला गाशा गुंडाळतील. सहाजिकच ते भारतीय शेअर बाजारासह इतर ठिकाणची गुंतवणूक काढून घेतील. ज्यामुळं शेअर बाजारात मोठ्या चढउताराचं सत्र येईल. २०२१-२५ या गेल्या पाच वर्षांमध्ये भारताची सरासरी वाढ ८.२ टक्के होती. आरबीआय ने आता साल २०२६-२७ साठी जवळपास ६.९ टक्के वाढीचे संकेत दिलेत. सध्या भारतातील महागाई ४ टक्क्यांच्या जवळपास असून ती सध्यातरी नियंत्रणात आहे. पण जर इंधन दरवाढीच संकट आणखी वाढलं तर मात्र देशासमोर महागाईचा मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.''

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाणी सत्याग्रहाशी संबंधित वारसा धोक्यात; सामाजिक कार्यकर्त्यांचा गंभीर आरोप

## पडघ्यातील १०० वर्षे जुनी ऐतिहासिक 'सतीची विहीर' चोरीला? प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा गावातील सुमारे १०० वर्षांहून अधिक इतिहास असलेली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीची साक्ष मानली जाणारी 'सतीची विहीर' रहस्यमयरीत्या बुजवण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाला तब्बल पाच महिने उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत ही विहीर अक्षरशः चोरीला गेली आहे असा गंभीर आरोप केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाणी सत्याग्रहाशी संबंधित मानली जाणारी ही ऐतिहासिक विहीर सर्वे नं. ७९/१० मध्ये अस्तित्वात होती. मात्र काही महिन्यांपूर्वी ती अचानक बुजवण्यात आल्याचे उघड झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते शरद साने आणि मिलिंद जाधव यांनी विविध शासकीय कार्यालयांकडे सातत्याने पाठपुरावा सुरू केला. त्यांनी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, ठाणे जिल्हाधिकारी, भिवंडी प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी तसेच तलाठी कार्यालयाकडे लेखी निवेदने सादर करून विहीर पुन्हा खुली करण्याची आणि तिचे ऐतिहासिक स्वरूप जतन करण्याची मागणी केली होती.

या निवेदनानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल भिवंडी तहसील कार्यालयाकडे सादर केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर तहसीलदार कार्यालयाकडून पडघा ग्रामपंचायतीस पत्र देण्यात आले. सदर प्रकरण ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, तहसीलदारांच्या आदेशानंतरही ग्रामपंचायतीने कोणतीही ठोस कारवाई न केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

सामाजिक कार्यकर्ते मिलिंद जाधव यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करत इतिहास जपण्याऐवजी प्रशासन त्यावर माती टाकत आहे, असा आरोप केला. तर सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी सतीची विहीर शोधून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल, अशी घोषणा केल्याने या प्रकरणाची चर्चा संपूर्ण परिसरात रंगू लागली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, ही विहीर केवळ पाण्याचा स्रोत नव्हती, तर सामाजिक समतेच्या लढ्याची ऐतिहासिक साक्ष होती. त्यामुळे या वारशाचे संवर्धन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना संबंधित यंत्रणांकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे जनतेत रोष निर्माण झाला आहे. दरम्यान, विहीर नेमकी कुठे गेली?, ती जाणीवपूर्वक बुजवण्यात आली का?, जबाबदारांवर कारवाई का होत नाही? असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीकाही होत आहे. पडघ्यातील 'सतीची विहीर' पुन्हा प्रकाशात येणार का, की इतिहासाच्या पानांतच कायमची गडप होणार? याकडे आता केवळ पडघाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

